"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे. 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/आस्था/190/2026-27** **दि.05/05/2026**

प्रति,
मुख्य सुरक्षा पर्यवेक्षीय अधिकारी,
महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन,
32 वा मजला, सेंटर-1, वर्ल्ड ट्रेड सेंटर,
कफ परेड, मुंबई-400005

विषय :- बुधवार दि.06/05/2026 रोजी महापालिका मुख्यालयातील तिस-या मजल्यावर होणा-या महासभेवेळी पत्रकारांना बसण्यासाठी असलेल्या दालनात तसेच नागरिक कक्षात सुरक्षारक्षक पुरवठा करणेबाबत.

संदर्भ :- 1. जा.क्र.मनपा/महापौर/63/2025-26, दि.17/03/2026 रोजीचे पत्र.

2. जा.क्र.मनपा/मावज/जावक/391/2025-26, दि.27/03/2026 रोजीचे पत्र

**आदेश**

बुधवार दि.06/05/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात मा.महासभा आयोजित करण्यात आलेली आहे.

काही वेळा सभागृहात मोबाईलदवारे शुटींग करताना आजूबाजूच्या व्यक्तींचे किंवा पत्रकारांचे आवाज रेकॉर्ड होत असल्यामुळे व्हिडीओमध्ये अवांछित आवाज अथवा कधीकधी असंसदीय शब्दही नोंदले जातात. मोबाईलदवारे चित्रिकरण अथवा इतर उपकरणांच्या वापरामुळे सभेच्या कामकाजात अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मा.महासभेच्या वेळी पत्रकारांना पत्रकार कक्षात प्रवेश देण्यासाठी संबंधित दैनिक, साप्ताहिक व मासिकांच्या कार्यालयांकडून त्यांच्या प्रतिनिधी पत्रकारांचे नाव, पत्ता व मोबाईल क्र. यांची माहिती मागवून घेणेबाबत व त्यानंतरच पत्रकारांना पत्रकार कक्षात प्रवेश देण्याची व्यवस्था करणेबाबत मा.महापौर यांनी संदर्भ क्र.01 च्या पत्रान्वये लेखी कळविले होते व त्यानुसार मा.महापौर यांच्या पत्रात दिलेल्या निर्देशानुसार कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, पत्रकार कक्षात पत्रकारांना प्रवेश देणे व पत्रात नमुद निर्देशाचे अनुपालन करणेकामी संदर्भ क्र.02 च्या पत्रान्वये श्री.राजकुमार घरत, माहिती व जनसंपर्क अधिकारी यांनी मा.महासभेच्या पत्रकार कक्षेकरीता सुरक्षारक्षक तैनात ठेवण्याबाबत कळविले होते. (सोबत संदर्भिय पत्रांची प्रत जोडली आहे.)

तरी बुधवार दि.06/05/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता आयोजित महासभेच्या अनुषंगाने एकूण 15 सुरक्षारक्षक (10 पुरुष, 05 महिला) तैनात ठेवण्यात यावेत. तसेच मा.महापौर यांच्या पत्रात दिलेल्या निर्देशानुसार कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, पत्रकार कक्षात पत्रकारांना प्रवेश देणे व पत्रात नमुद निर्देशाचे अनुपालन करण्यात यावे.

(सुनिल यादव)
सहा.आयुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :

1.मा.उपायुक्त (सुरक्षा)

2.मा.नगरसचिव, नगरसचिव विभाग

2.मा.माहिती व जनसंपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क विभाग

\\Mayurasthapana1\d\कृतिका\सुरक्षा रक्षक\आदेश-सुरक्षा रक्षक पुरवठा - Copy.docx

# डिंपल विनोद मेहता
## महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

E-8633169

जा.क्र/मनपा/महापौर/६३ /२०२५-२६

मिरा भाईंदर महानगरपालिका
आयुक्त कार्यालय
खाते ....जनसंपर्क विभाग....
आ.क्र ....908 .... दिनांक 16/3/26
स्वीय सहाय्यक उपायुक्त (मु.)
E/8634795 आयुक्त

दि.१७/०३/२०२६

प्रति,
मा. आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेमध्ये पत्रकारांना प्रवेशाबाबत.**

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेच्या बैठकीत विविध महत्त्वाच्या लोकहिताच्या विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेतले जात असतात. सदर बैठकीतील कामकाजाची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी पत्रकार प्रतिनिधी सभागृहा शेजारील पत्रकार कक्षात उपस्थित राहून वार्तांकन करीत असतात.

तथापि, काही वेळा सभागृहात मोबाईलद्वारे शुटींग करताना आजूबाजूच्या व्यक्तींचे किंवा पत्रकारांचे आवाज रेकॉर्ड होत असल्यामुळे व्हिडिओमध्ये अवांछित आवाज अथवा कधीकधी असंसदीय शब्दही नोंदले जातात. मोबाईलद्वारे चित्रिकरण अथवा इतर उपकरणांच्या वापरामुळे सभेच्या कामकाजात अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

पत्रकारांना मा. महासभेच्या वेळी पत्रकार कक्षात प्रवेश देण्यासाठी संबंधित दैनिक, साप्ताहिक व मासिकांच्या कार्यालयांकडून त्यांच्या प्रतिनिधी पत्रकारांचे नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक यांची माहिती मागवून घ्यावी व त्यानंतरच पत्रकारांना पत्रकार कक्षात प्रवेश देण्याची व्यवस्था करावी.

DMC [HQ] & PRO

Dmehta
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

17/3
आयुक्त

मुख्य कार्यालय : मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे -४०१ १०१.
दूरध्वनी : 022-28190344 Email : mbmcmayor199@gmail.com

Scanned with CamScanner

25 वर्षे विकासाची

"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-४०१ १०१,दुरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ Email :- pro@mbmc.gov.in

## माहिती व जनसंपर्क विभाग


जा.क्र.मनपा/मावज/जावक/३९७/२०२५-२६ दि.२७/०३/२०२६

E-8696360
27/03/2026

प्रति,
सहा. आयुक्त
आस्थापना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय — मा. महासभेच्या पत्रकार कक्षेकरीता सुरक्षा रक्षक तैनात ठेवणेबाबत.**
**संदर्भ — जा.क्र.मनपा/महापौर/६३/२०२५-२६, दि. १७.०३.२०२६.**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सचिव विभागामार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात तिसरा मजला सभागृह कक्ष येथे दि. २७.०३.२०२६ रोजी दु. ३.०० वाजता मा. महासभेचे आयोजन केलेले आहे. पत्रकारांसाठी मा. महासभे शेजारी पत्रकार कक्ष व नागरिक कक्ष आहेत. सदर पत्रकार कक्षात दैनिक, साप्ताहीक व मासिकांच्या कार्यालयातून पत्रकारांची माहिती मागवून प्रवेश देणेबाबत वरील संदर्भीय निर्देश प्राप्त झाले आहेत. त्या अनूषंगाने मा. महापौर यांच्या सोबतच्या पत्रान्वये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, पत्रकार कक्षात पत्रकारांना प्रवेश देणे व पत्रात नमूद निर्देशाचे अनूपालन करणेकामी सूरक्षा रक्षक तैनात ठेवण्यात यावेत.

राजकुमार घरत
माहिती व जनसंपर्क अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत माहितीस्तव —**

१. मा. आयुक्त सो.
मिरा भाईंदर महानगरपालिका.
२. मा. उप-आयुक्त सो.
आस्थापना विभाग
माहिती व जनसंपर्क विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका.

Scanned with CamScanner